१७ व्या वर्षात यशस्वापर्ण करणारे साप्ताहिक..

..मंत्रिमंडळ विस्तार,३३ कॅबिनेट मंत्र्यांनी तर ६ राज्यमंत्र्यांनी घेतली शपथ(पान क्र.४ वर)


# प्रगत भारत

सभासद,बातम्या विशेष मुलाखत व दररोजच्या वेब पोर्टल न्यूज www.pragatatbharat.com-९८६०८७७७८९

● वर्ष:१७ ● अंक. क्र.२४ ● साप्ताहिक ● मंगळवार दि. १७ ते २३ डिसेंबर २०२४ ● RNI/MAH/MRA/2008/25149 ● RNP-PCE / पोस्ट/006/2024-2026 ● पृष्ठे-४ ● किंमत:२.००




अप्रतिम विश्वासाच अलिशान दालन..
LAXMI JEWELLERS
सरकारमान्य सोने-चांदी दागिन्यांची खात्रीशीर जुनी पेढी
लक्ष्मी ज्वेलर्स
रूक्मिणी कॉम्पलेक्स,देहु-आळंदी रोड,टाळगाव चिखली,पुणे मो-९८९०१५४३५४
AI-Generated Image


## गुरुरविदासमंदीराचा वर्धापन दिन जल्लोषात साजरा

साप्ताहिक प्रगत भारत
दररोजच्या बातम्या व जाहिराती..
E-Peper web pragatbharat.com

**पुणे:**जगाला मानवतेचा संदेश देणारे पहिले संत गुरु रविदास महाराज यांच्या कात्रज येथील गुरु रविदास मंदीर तिसरे धाम येथे २१वा वर्धापन दिन मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला.

दि.६आणि ७ डिसेंबर रोजी अमृत वाणी,चरण पादुका पुजन, अखिल भारतीय रविदासीया धर्मसंघठनचे आयोजित करण्यात आलेली धर्म परिषद, देशभरातून आलेल्या संतांचे मार्गदर्शन असे भरगच्च कार्यक्रम आयोजित केले होते. कात्रज चौकातून निघालेली गुरु रविदास शोभा यात्रा वाजत गाजत मोठ्या जल्लोषात गुरु रविदास मंदीर तिसरे धाम येथे पोहचल्यावर फटाक्यांची आतिषबाजी करून यात्रेचा समारोप करण्यात आला.

यावेळी पंजाब येथून अखिल भारतीय रविदासीया धर्मसंघठनचे चेअरमन १०८संत श्री निरंजन दास महाराज, व अन्य संत महापुरूष उपस्थित होते याचे नियोजन राष्ट्रीय अध्यक्ष संत श्री सुखदेव महाराज यांनी केले होते अशी माहिती श्री अमोल जी वाघमारे यांनी दिली



या कार्यक्रमा साठी अधिक परिश्रम गुरु रविदास महाराज मंदिर तिसरे धर्म स्थान कात्रज सेवादार कमिटी केले बालाजी दुधबे,संतोष कांबळे, सुधीर वाघमारे,अनमोल वाघमारे, निरंजन चीमा,राजू सेवडार ,मोतीराम कांबळे ,संतोष सोनवणे, जालिंदर सोनवणे,सह देश विदेशातील संत, राजकीय नेते,समाज सुधारक, गुरु रविदास प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**पुणे:येथे असलेल्या संत गुरू रविदास तिसरे धाम कात्रज येथील कार्यक्रमानिमित्त उपस्थित असलेले भीम आर्मी भारत एकता मिशन राष्ट्रीय संयोजक/अध्यक्ष विजय रतन सिंह उपस्थित होते.यावेळी त्यांना साप्ताहिक प्रगत भारत वृतपत्रकाचे संपादक दत्तात्रय कांबळे यांनी त्यांची सदिच्छा भेट घेऊन साप्ताहिक प्रगत भारत वृतपत्रकाचा अंक भेट दिला.यावेळी सामाजिक कार्यकर्ता रामेश्वर पाचारे आदी मान्यवर व्यक्ती यावेळी उपस्थित होते.**

## एक्सआयटी ग्रुप फक्त सायबर सुरक्षेसाठी नव्हे, तर सामाजिक विकासाचीही आपली जबाबदारी ओळखतो:- सीईओ रोहित कांबळे

### एक्सआयटी ग्रुपने दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना मोफत सायकलचे वाटप

साप्ताहिक प्रगत भारत
दररोजच्या बातम्या व जाहिराती..
E-Peper web pragatbharat.com

**पुणे:**सातारा जिल्ह्यातील जावळी तालुक्यातील शेंबडी आणि बामणोली या दुर्गम भागातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाचा प्रवास सोपा करण्याच्या उद्देशाने पिंपरी चिंचवड शहरामधील एक्सआयटी ग्रुपने अत्यंत कौतुकास्पद आणि दिलासादायक पाऊल उचलले आहे. डोंगराळ भागातील विद्यार्थी दररोज ७ किलोमीटरचा पायी प्रवास करून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,शेंबडी आणि न्यू इंग्लिश स्कूल,बामणोली या शाळांमध्ये पोहोचत होते.या कठीण प्रवासाला सहकार्य करत,एक्सआयटी ग्रुपने १५ विद्यार्थ्यांना सायकलींचे वाटप करून शिक्षणाच्या प्रवासाला नवा आशय दिला आहे.

एक्सआयटी ग्रुपचे सीईओ रोहित कांबळे यांनी विद्यार्थ्यांच्या समस्यांची दखल घेत तातडीने मदतीचा निर्णय घेतला.''शिक्षणही यशस्वी जीवनाची गुरुकिल्ली आहे, आणि विद्यार्थ्यांच्या स्वप्नांमध्ये अडथळा येऊ नये यासाठी आम्ही मदतीचा हात पुढे केला,'' असे ते म्हणाले.''सायकल ही फक्त प्रवासाचे साधन नसून, विद्यार्थ्यांच्या भविष्याच्या दिशेने उचललेले ठोस पाऊल आहे,'' हे त्यांनी ठामपणे सांगितले. सायकलींचे वितरण समारंभ शेंबडी व बामणोली गावात मोठ्या उत्साहात पार पडले. या वेळी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,शेंबडीचे शिक्षक राऊत सर आणि न्यू इंग्लिश स्कूल, बामणोलीचे शिक्षकवर्ग उपस्थित होते.गावकऱ्यांनी एक्सआयटी ग्रुपचे आभार मानत त्यांच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक केले.

रोहित कांबळे यांनी अधिक माहिती देताना सांगितले की,एक्सआयटी ग्रुप फक्त सायबर सुरक्षेसाठी नव्हे,तर सामाजिक विकासासाठी ही आपली जबाबदारी ओळखतो.याआधी सायबर सुरक्षे संदर्भात ग्रामीण भागात जनजागृती मोहिमा राबवणाऱ्या एक्सआयटी ग्रुपने या उपक्रमाद्वारे ग्रामीणउपक्रम केवळ विद्यार्थ्यांसाठी नाही,तर संपूर्ण समाजासाठी सकारात्मक संदेश देणारा आहे.

सायकलींच्यामदतीने विद्यार्थ्यांचा वेळ वाचेल,प्रवास सुलभ होईल,आणि त्यांना अभ्यासासाठी अधिक वेळ मिळेल.यामुळे या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच समाजाच्या विकासालाही चालना मिळेल. ग्रुपच्या या सामाजिक बांधिलकीने शेंबडी व बामणोली गावांतील एक नवा अध्याय लिहिला आहे,जो ग्रामीणभागातील शिक्षणाला प्रोत्साहन देईल आणि विद्यार्थी हिताच्या कार्यासाठी प्रेरणादायी ठरेल.





**वरील पहिल्या छायाचित्रामध्ये एक्सआयटी ग्रुपचे सीईओ रोहित कांबळे यांचा सत्कार करताना मुख्याध्यापक व शिक्षकवृंद तर दुसऱ्या छायाचित्रात सातारा जिल्ह्यातीलजिल्हा परिषद प्राथमिक शाळा,शेंबडी आणि न्यू इंग्लिश स्कूल,बामणोली भागातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाचा प्रवास सोपा करण्याच्या उद्देशाने पिंपरी चिंचवड शहरामधील एक्सआयटी ग्रुपचे सीईओ रोहित कांबळे यांच्या उपस्थितीत एक्सआयटी ग्रुपने १५ विद्यार्थ्यांना सायकलींचे वाटप करून शिक्षणाच्या प्रवासाला नवा आशय दिला आहे.**


मानवंदना.! व नवीन वर्ष २०२५ शुभेच्छा..!




शौर्य दिनानिमित्त भिमा कोरेगाव येथे विजयास्तंभाला सा.प्रगत भारत वृतपत्रकाच्या वतीने मानवंदना..!
व प्रगत भारत वृतपत्रकाचे वाचक,जाहिरातदार हितचिंतक यांना येणाऱ्या नवीन वर्ष २०२५ च्या हार्दिक शुभेच्छा..!

-: शुभेच्छुक :-

दत्तात्रय कांबळे
(संपादक- सा. प्रगत भारत वृतपत्र व वेब न्यूज )
९८६०८७७७८९




## महानगरपालिका निवडणुकांचा मार्ग मोकळा; सुप्रीम कोर्टाने दिले 'हे' निर्देश

**मुंबई:**-राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. ज्या कारणांमुळे निवडणुका रखडल्या आहेत, त्या कारणांचं वर्गीकरण करण्याचे निर्देश सुप्रीम कोर्टाने दिले आहेत. त्यामुळे येत्या काही दिवसांत राज्यात पुन्हा आचारसंहिता लागू शकते.

राज्यातील महानगर पालिका, नगर परिषद, नगर पंचायत आणि जिल्हा परिषद, पंचायत समित्यांच्या निवडणुका रखडलेल्या आहेत. त्यामुळे त्यामुळे 'ईशाद' या संस्थेकडून सुप्रीम कोर्टात जनहित याचिका दाखल करण्यात आलेली आहे. या याचिकेवरील सुनावणी करताना सुप्रीम कोर्टाने महत्वाची टिपण्णी केली.

राज्यनिहाय स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका प्रलंबित असणाऱ्या कारणांचे वर्गीकरण करण्याचे निर्देश सुप्रीम कोर्टाने दिले आहेत. प्रत्येक राज्यातील कारणमीमांसा व परिस्थिती वेगळी आहे, जर समाधानकारक कारण नसेल तर निवडणूक घेण्याचे आदेश देता येतील, असंही कोर्टाने म्हटलय.

केवळ महाराष्ट्र नाही तर देशातील अनेक स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका प्रलंबित असल्याने सुप्रीम कोर्टात याचिका दाखल करण्यात आलेली होती. त्यावर कोर्टाने निर्देश देत एक प्रकारे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचं संकेत दिले आहेत.

राज्यामध्ये विधानसभा निवडणुकीच्या निकालात २३० जागांवर महायुतीने यश मिळवलेलं आहे. एवढं मोठ यश मिळाल्यांनतर आता तर महापालिकेच्या निवडणुका लागतील,असा सूर विरोधकांनी आळवला होता. त्यामुळे खरंच निवडणुका होतात की नाही, हे पाहाणं महत्त्वाचं आहे.


साप्ताहिक 'प्रगत भारत' वृतपत्रकाची सभासद वर्गणी वार्षिक सभासद-५००/- द्विवार्षिक १,०००/- पंचवार्षिक -२०००/- सभासद होण्यासाठी तसेच जाहिरातीसाठी खालील नंबरवर संपर्क साधावा.
Mob. 9860877789
Web-www.pragatbharat.com

पिंपरी-चिंचवड शहरामधील व्यावसायिक,व्यापारी, शैक्षणिक....असंख्य ग्राहकांचा विश्वास असलेले.!

विकास इन्फोटेक
MSCIT-
१००% JOB ORIENTED COMPUTER COURSES
TALLY PRIME · GST · AUTOCAD · WEB DESIGNING · ADV. EXCEL · HARDWARE · OTHERS
9764407399 / 9762799070

XITSOFTECH(OPC) PVT.
We manag your IT,so you can manageyour business.
Cyber Security,Forensic Analysis,App Development,Malware Analysis,Logo Desingning,Digital Marketing,Bulk SMS/ Voice call,Cybercrime Detection,Training & Education,Website Development,Social Media Growth,IT Consulting & Audit
web-www.xitsafe.com mo-887977 7707

VIP EVENTO'S
WE Undertake allTypes of
wedding Decoration, Birthdaye Decoration, Baby shwer DE, Original flowers DE, House Warming, Stage Show Event,s office FunctionCorporate Events..
Add-170,Dhayaneshwar colony,Akurdi,chowk pune-411035 mob-9766588539/9359142149

हरी ॐ फर्निचस
ऑडरप्रमाणे घरगुती सर्व इंटरियर फर्निचर तयार करून मिळेल
ऑफीस:१६३८,रामदासनगर,टाळगाव चिखली,तालुका हवेली जिल्हा पुणे-६३
मो:९२२५८५७४८४,९९२२०५१९१५

प्रा.नितीन साळी
सुत्रसंचालक,निवेदक, मुलाखतकार
मोरया क्लासेस(इय.१ ली ते इ.१०)
इंग्रजी,सेमी,मराठी माध्यम
संचालक-मोरयाअॅकॅडमी-स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र(UPSC,MPSC)
मोरया स्पोकन इंग्लिश अकॅडमी
मो.नं.-९८२२६१२४६९ टाळगाव चिखली

सुवर्णसंधी सभासद अभियान
वाढदिवस तुमचा, शुभेच्छा आमच्या...
सा.प्रगत भारत वृत्तपत्रकाचेआजच सभासद व्हा..मो.नं.९८६०८७७७८९

# पिं.चिं.एज्युकेशन ट्रस्ट आणि दक्षिण कोरियातील क्वांगवून विद्यापीठात शैक्षणिक सामंजस्य करार



साप्ताहिक प्रगत भारत
दररोजच्या बातम्या व जाहिराती..
E-Peper web pragatbharat.com

**पिंपरी:**दक्षिण कोरियातील क्वांगवून विद्यापीठ जागतिक पातळीवर उत्कृष्ट, दर्जेदार,आधुनिक विज्ञान तंत्रज्ञान शिक्षण देण्यासाठी नावलौकिक मिळवला आहे. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) शैक्षणिक समूहातील संस्थेमधील विद्यार्थी, प्राध्यापकांना आंतरराष्ट्रीय स्तरावरील उच्च शैक्षणिक संधी,संशोधन करण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे असे मत दक्षिण कोरियाच्या क्वांगवून विद्यापीठातील आंतरराष्ट्रीय विभाग संचालक डॉ.सुंगवू बेंजामिन चो यांनी व्यक्त केले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) आणि क्वांगवून विद्यापीठ यांच्या मध्ये नुकताच शैक्षणिक सामंजस्य करार करण्यात आला. निगडी येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (पीसीसीओई) येथे झालेल्या कार्यक्रमात सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. या करारामुळे पीसीईटी येथे कोरियन भाषा केंद्र,अल्प मुदतीचे पदविका अभ्यासक्रम, द्विपक्षीय संशोधन,कार्यशाळा आयोजित करण्यास मदत मिळणार आहे.

यावेळी वुई ब्रिंगच्या मुख्य कार्यकारी अधिकारी टीना चो, क्वांगवून विद्यापीठातील इलेक्ट्रिकलआणि बायोलॉजिकल फिजिक्स आणि प्लाझ्मा बायोसायन्स रिसर्च सेंटर विभागाचे प्रा. नागेंद्रकुमार कौशिक, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील,पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे,उपाध्यक्षा पद्माताई भोसले,सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ.गिरीश देसाई, पीसीसीओईचे संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी,पीसीईटी आंतरराष्ट्रीय संबंध,संशोधन सल्लागार डॉ.दिनेश अमळनेरकर व विविध विद्याशाखेचे विभाग प्रमुख उपस्थित होते.

क्वांगवून विद्यापीठा बरोबर झालेल्या या सामंजस्य करारामुळे पिंपरी चिंचवड विद्यापीठ येथे कोरियन भाषा केंद्र स्थापन करण्यात येणार असून या अंतर्गत विद्यार्थ्यांना कोरियन भाषा प्रशिक्षण दिले जाणार आहे. तसेच सेमीकंडक्टर या विषया मधील संशोधनाला चालना देण्यासाठी सेंटर ऑफ एक्सीलेंस सुरु करण्यात येणार आहे. अल्पकालीन प्रशिक्षण अंतर्गत दोन ते सहा महिन्यांचे प्रशिक्षण हे या करारामधील वैशिष्ठ्य आहे. हे प्रशिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना कोरिया मध्ये नोकारीच्या संधी उपलब्ध करून देण्याची तयारी वुई ब्रिंगच्या मुख्य कार्यकारी अधिकारी टीना सांगितले.

# न्यू सिटी प्राईड स्कूल मध्ये ''पुणे पुस्तक महोत्सव अंतर्गत पुस्तक वाचन दिन साजरा करण्यात आला''



साप्ताहिक प्रगत
दररोजच्या बातम्या व जाहिराती..
E-Peper web pragatbharat.com

**पुणे:**क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले एज्युकेशन फॉउंडेशन संचलित न्यू सिटी प्राईड इंग्लिश मिडीयम स्कूल रहाटणी येथे '' पुणे पुस्तक महोत्सवा अंतर्गत आयोजित शांतता.... पुणेकर वाचत आहेत''हा उपक्रम आज शाळेत घेण्यात''आला.

या वेळी संस्थेचे संस्थापक अरुण चाबुकस्वार शाळेचे उपमुख्याध्यापक सचिन कळसाईत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.यावेळी शाळेतील इयत्ता पहिली ते दहावीच्या सर्व विद्यार्थ्यांनी एक तास पुस्तक वाचन केले. विद्यार्थ्यांच्या समवेत शिक्षकांनीही पुस्तक वाचन केले. वाचन चळवळ सक्षम करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना त्यातून आवड निर्माणसाठी विद्यार्थ्यांना विविध साहित्यकाची पुस्तके आणण्यासाठी सांगितलेली होती. विद्यार्थ्यांनी यामध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला होता.

# डॉ.योगेश भावसार यांना पीएचडी प्रदान



साप्ताहिक प्रगत भारत
दररोजच्या बातम्या व जाहिराती..
E-Peper web pragatbharat.com

**पिंपरी:**पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) चे प्रा.योगेश विनोद भावसार यांना पुणे येथील श्री बालाजी विद्यापीठाकडून पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली.डॉ.भावसार यांनी ''भारतीय उत्पादन क्षेत्रातील दीर्घकालीन एकीकरणाचे आर्थिक कामगिरीचे विश्लेषण'' या विषयावर शोधप्रबंध सादर केला. डॉ. भावसार हे पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) या संस्थेमध्ये रजिस्ट्रार व ओएसडी या पदावर कार्यरत आहेत. तसेच त्यांचा वरील विषयावर आधारीत शोधप्रबंध तुर्की येथे ऑनलाईन जर्नल मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. डॉ. लिना डाम यांचे मार्गदर्शन लाभले. या पदवी प्रदान सोहळ्यात बालाजी विद्यापीठाचे कुलपती परमानंदम यांच्या हस्ते डॉ. भावसार यांना पदवी प्रदान करण्यात आली. यावेळी पॅनासोनीक इंडिया कंपनीचे प्रमुख आदर्श मिश्रा, बालाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. जी. के. शिरोडे, रजिस्ट्रार डॉ. एस. बी. आगाशे तसेच प्रा. भाग्यश्री भावसार, मोहनीश भावसार आदी उपस्थित होते. डॉ. भावसार हे वयाच्या २९ व्या वर्षी २०१० साली राज्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयातील सर्वात तरुण रजिस्ट्रार म्हणून सेवेत रुजू झाले होते. पिंपरी चिंचवड एजुकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त व माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी प्रा. डॉ. योगेश भावसार यांचे अभिनंदन केले

# महाराष्ट्रामधील विधानसभेत महायुती सरकारचा मंत्रिमंडळ विस्तार,एकूण ३३ कॅबिनेट मंत्र्यांनी तर ६ राज्यमंत्र्यांनी घेतली शपथ



साप्ताहिक प्रगत भारत
दररोजच्या बातम्या व जाहिराती..
E-Peper web pragatbharat.com

**मुंबई:**मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्री यांच्या शपथविधीनंतर दोन आठवडे होत आले,तरी मंत्रिमंडळाचा विस्तार होत नसल्यानं महायुतीत खाते वाटपावरून नाराजी आहे का,अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू होती. मात्र, अखेरीस नागपूरमध्ये होणाऱ्या हिवाळी अधिवेशनाच्या आधी मंत्रिमंडळ विस्ताराला मुहूर्त मिळाला.नागपूरमधील राजभवनाच्या लॉनवर मंत्रिमंडळ विस्ताराचा सोहळा पार पडला.

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी नव्या मंत्र्यांना पद आणि गोपनियतेची शपथ दिली.कुणाच्या वाट्याला किती मंत्रिपदं?देवेंद्र फडणवीस यांच्या रुपाने भाजपकडे मुख्यमंत्रिपद,तर अजित पवार (राष्ट्रवादी काँग्रेस) आणि एकनाथ शिंदे(शिवसेना) हे उपमुख्यमंत्री आहेत.

भाजप १९ शिवसेना (एकनाथ शिंदे गट) ११राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)९

भाजपचे मंत्रिमंडळातील नवे मंत्री महाराष्ट्रात भाजपच्या वाट्याला मुख्यमंत्रिपद आलं असून, देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्रिपदी विराजमान झाले आहेत. तसंच,१६ कॅबिनेट आणि ३ राज्यमंत्रिपदंही भाजपच्या वाट्याला आले आहेत.भाजपनं तीन महिला नेत्यांना मंत्रिमंडळात स्थान दिलं आहे.**कॅबिनेट मंत्री:१)** चंद्रशेखर बावनकुळे२)राधाकृष्ण विखे पाटील३)चंद्रकांत पाटील४)गिरीश महाजन५)अतुल सावे६)गणेश नाईक७)मंगलप्रभात लोढा८)शिवेंद्रराजे भोसले९)जयकुमार रावल१०)पंकजा मुंडे११)आशिष शेलार१२)अशोक उईके१३)जयकुमार गोरे१४)संजय सावकारे१५)नितेश राणे१६)आकाश फुंडकर

**राज्यमंत्री**:१७)माधुरी मिसाळ १८)मेघना बोर्डीकर१९)पंकजभोईर

**शिवसेनेचे नवे मंत्री शिवसेनेचे** प्रमुख नेते एकनाथ शिंदे हे उपमुख्यमंत्री झाले असून,त्यांच्या पक्षाला ९ कॅबिनेट आणि २ राज्यमंत्रिपदं मिळाली आहेत.**कॅबिनेट मंत्री :१)** शंभुराज देसाई२)उदय सामंत३) दादा भुसे४)गुलाबराव पाटील५) संजय राठोड६) संजय शिरसाट७) प्रताप सरनाईक८)भरत गोगावले९) प्रकाश आबिटकर

**राज्यमंत्री:१०)**आशिष जयस्वाल११)योगेश कदम

**राष्ट्रवादी काँग्रेसचे(अजित** पवारगट)मंत्रिमंडळातील नवे मंत्री उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला ८ कॅबिनेट,तर एक राज्यमंत्रिपद मिळालं आहे.छगन भुजबळ, दिलीप वळसे पाटील अशा दिग्गजांना अजित पवारांनी डच्चू दिल्याचं दिसून येत आहे. **कॅबिनेट मंत्री :१)** हसन मुश्रीफ२)आदिती तटकरे३)बाबासाहेब पाटील४)दत्तात्रय भरणे५)नरहरी झिरवळ६)माणिकराव कोकाटे७) मकरंद जाधव-पाटील८)धनंजय मुंडे

**राज्यमंत्री:९)**इंद्रनील नाईक

# आपचे युवक शहराध्यक्ष रविराज काळे यांच्या २०२५ च्या दिनदर्शिकेचे खासदार संदीप फाटक यांच्या हस्ते प्रकाशन



साप्ताहिक प्रगत भारत
दररोजच्या बातम्या व जाहिराती..
E-Peper web pragatbharat.com

**पिंपरी:**-आम आदमी पार्टीचे युवक शहराध्यक्ष रविराज काळे यांच्या २०२५ दिनदर्शिकेचे प्रकाशन पक्षाचे राष्ट्रीय संघटक,राज्यसभा खासदार संदीप फाटक यांचे हस्ते संपन्न झाले.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांसंदर्भात चर्चा करण्यासाठी आणि पक्षाला नवी उभारी देण्यासाठी रविराज काळे यांनी नुकतीच दिल्ली येथे पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांची भेट घेतली. पक्ष विस्तार आणि संघटनात्मक विषयांवर त्यांनी चर्चा केली. रविराज काळे यांनी आपल्या कार्याचा अहवाल पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांना सादर केला. तसेच नवीन वर्षाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले.

यावेळी पार्टीचे महाराष्ट्र कार्याध्यक्ष अजित फाटके, अभिजीत मोरे, मुकुंद किर्दत, युवक प्रदेशाध्यक्ष मयुर दौंडकर, अमित मस्के यासह राज्यातील अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

साप्ताहिक 'प्रगत भारत' वृतपत्रकाची सभासद वर्गणी वार्षिक सभासद-५००/- द्विवार्षिक १,०००/- पंचवार्षिक -२०००/- सभासद होण्यासाठी तसेच जाहिरातीसाठी खालील नंबरवर संपर्क साधावा.
Mob. 9860877789
Web-www.pragatbharat.com

सुवर्णसंधी सभासद अभियान
वाढदिवस तुमचा, शुभेच्छा आमच्या...
सा.प्रगत भारत
वृत्तपत्रकाचेआजच सभासद व्हा..मो.नं.९८६०८७७७८९